भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१

**(१९५१ चा अधिनियम क्रमांक ६१)**

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The All-India Services Act, 1951

## (Act No. 61 of 1951)

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९८१)

[किंमत—५० पैसे]

## विशोधन अधिनियमांची सूची

१. 'अखिल भारतीय सेवा (विशोधन) अधिनियम, १९५८'(१९५८ चा २५).

२. 'अखिल भारतीय सेवा (विशोधन) अधिनियम, १९६३'(१९६३ चा २७).

३. 'अखिल भारतीय सेवा (विशोधन) अधिनियम, १९७५'(१९७५ चा १९).

४. 'अखिल भारतीय सेवा (विशोधन) अधिनियम, १९७५'(१९७५ चा २३).

एच ४३२० (५३०—२-८१)

# अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१

## कलमांचा क्रम

**कलमे**


१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

२क. इतर अखिल भारतीय सेवा.

३. भरती आणि सेवाशर्ती यांचे विनियमन.

# अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१

## (१९५१ चा अधिनियम क्रमांक ६१)

[२९ ऑक्टोबर, १९५१]

**संघराज्य आणि राज्ये यांना सामाईक असणाऱ्या अखिल भारतीय सेवांमधील भरती आणि तेथे नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती विनियमित करण्यासाठी अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियम होवो :—

१. या अधिनियमास 'अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव.**

२. या अधिनियमात "अखिल भारतीय सेवा" या शब्दप्रयोगाचा अर्थ 'भारतीय प्रशासनिक सेवा' म्हणून ओळखली जाणारी सेवा किंवा 'भारतीय पोलीस सेवा' म्हणून ओळखली जाणारी सेवा [1][किंवा कलम २क मध्ये विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही सेवा] असा आहे. **व्याख्या.**

[2][२क. केंद्र शासन याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकी व तेव्हापासून पुढील अखिल भारतीय सेवा घटित करण्यात येतील आणि वेगवेगळ्या सेवांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील, त्या सेवा अशा :— **[2][इतर अखिल भारतीय सेवा.]**

१. भारतीय अभियंता सेवा (पाटबंधारे, वीज, बांधकाम आणि रस्ते);

२. भारतीय वन सेवा;

३. भारतीय वैद्यकीय आणि आरोग्य सेवा.]

३. (१) [3][जम्मू व काश्मीर राज्यांसुद्धा] संबंधित राज्यांच्या शासनांचा विचार घेतल्यानंतर [4][आणि **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] केंद्र शासनाला, एखाद्या अखिल भारतीय सेवेमधील भरती व तेथे नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या सेवाशर्ती विनियमित करण्यासाठी नियम[5] करता येतील. **भरती आणि सेवाशर्ती यांचे विनियमन.**

[6][(१क) या कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या नियम करण्याच्या शक्तीमध्ये, त्या नियमांना किंवा त्यांपैकी कोणत्याही नियमाला, जो या अधिनियमाच्या प्रारंभ-दिनांकाच्या पूर्वीचा नाही अशा एखाद्या दिनांकापासून भूतलक्षी प्रभाव देण्याची शक्ती समाविष्ट आहे, परंतु एखादा नियम ज्या कोणत्याही व्यक्ती-ला लागू असेल तिच्या हितसंबंधावर जेणेकरून बाधक परिणाम होईल अशा प्रकारे अशा नियमाला भूतलक्षी प्रभाव देण्यात येणार नाही.]

[7][(२) केंद्र शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम आणि अशा कोणत्याही नियमाखाली किंवा त्यास अनुसरून केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या

---

१. १९६३ चा अधिनियम २७—कलम २ द्वारे घातले.

२. कित्ता—कलम ३ द्वारे घातले.

३. १९५८ चा अधिनियम २५—कलम २ द्वारे घातले.

४. १९७५ चा अधिनियम १९—कलम ३ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

५. 'भारतीय प्रशासनिक सेवा (भरती) नियम, १९५४' यांसाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९५४, असाधारण, भाग एक, विभाग एक, पृष्ठ ८८५.

'भारतीय प्रशासनिक सेवा (परिवीक्षा) नियम, १९५४' यांसाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९५४, असाधारण, भाग एक, विभाग एक, पृष्ठ ८९३.

'अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता—पृष्ठ ९१४.

'भारतीय प्रशासनिक सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता—पृष्ठ ९०७.

'भारतीय प्रशासनिक सेवा (श्रेणी) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता—पृष्ठ ९०२.

'भारतीय पोलीस सेवा (परिवीक्षा) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता—पृष्ठ ८९७.

'भारतीय पोलीस सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता पृष्ठ ९११.

'भारतीय पोलीस सेवा (भरती) नियम, १९५४' यांसाठी पहा—कित्ता—पृष्ठ ८८७.

६. १९७५ चा अधिनियम २३—कलम २ द्वारे घातले.

७. १९७५ चा अधिनियम १९—कलम ३ द्वारे पूर्वीच्या पोटकलमाऐवजी हे कलम घातले.

अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**विद्यमान नियम चालू राहणे.**

४. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असणारे आणि अखिल भारतीय सेवेस लागू असणारे सर्व नियम अंमलात असण्याचे चालू राहतील आणि ते या अधिनियमाखाली केलेले नियम म्हणून मानण्यात येतील.

## THE ALL-INDIA SERVICES ACT, 1951

## अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| all-India Service | अखिल भारतीय सेवा | [S. 2] |
| conditions of service | सेवाशर्ती | [Short title] |
| Indian Administrative Service | भारतीय प्रशासनिक सेवा | [S. 2] |
| Indian Forest Service | भारतीय वन सेवा | [S. 2A(2)] |
| Indian Medical and Health Service | भारतीय वैद्यकीय आणि आरोग्य सेवा | [S. 2A(3)] |
| Indian Police Service | भारतीय पोलीस सेवा | [S. 2] |
| Indian Service of Engineers | भारतीय अभियंता सेवा | [S. 2A(1)] |
| motion | प्रस्ताव | [S. 3(2)] |
| recruitment | भरती | [Long title] |

## अखिल भारतीय सेवा अधिनियम, १९५१

## THE ALL-INDIA SERVICES ACT, 1951

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखिल भारतीय सेवा | all-India Service | [S. 2] |
| प्रस्ताव | motion | [S. 3(2)] |
| भरती | recruitment | [Short title] |
| भारतीय अभियंता सेवा | Indian Service of Engineers | [S. 2A(1)] |
| भारतीय पोलीस सेवा | Indian Police Service | [S. 2] |
| भारतीय प्रशासनिक सेवा | Indian Administrative Service | [S. 2] |
| भारतीय वन सेवा | Indian Forest Service | [S. 2A(2)] |
| भारतीय वैद्यकीय आणि आरोग्य सेवा | Indian Medical and Health Service | [ S. 2A(3)] |
| सेवाशर्ती | conditions of service | [Long title] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई